# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.11.2025** **वारःरविवार**

---

1 ) उत्तराखंड राज्य स्थापनेच्या रौप्य महोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आज डेहराडून इथ आयोजित कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार

2 ) राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आफ्रिकेतील अंगोला आणि बोत्सवाना या दोन देशांच्या दौऱ्यावर

3 ) बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचाराचा आज अखेरचा दिवस आणि

4 ) ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका भारतानं 2-1 ने जिंकली.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

उत्तराखंड राज्य स्थापनेच्या रौप्य महोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आज डेहराडून इथ आयोजित कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते रौप्यमहोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष टपाल तिकीटाच प्रकाशन करण्यात येणार असून , पंतप्रधान जाहीर सभाही घेणार आहेत . तसच यावेळी उत्तराखंड मधील सुमारे 8 हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचा कोनशीला आणि उद्‌घाटन समारंभही त्यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत 28 हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 62 हजार कोटी रुपये हस्तांतरित करण्याचा कार्यक्रम ही यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे .

**<u>पंतप्रधानन्यायालय</u>**

सामाजिक अथवा आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न होता प्रत्येकाला न्याय मिळेल, तेव्हाच सामाजिक न्यायाची हमी देता येईल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. न्यायदान प्रक्रिया बळकट करण्यासाठी राष्ट्रीय चर्चासत्राचं काल नवी दिल्लीत उद्‌घाटन करताना ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत सरकारनं न्याय सुलभतेच्या दृष्टीनं अनेक उपाययोजना केल्या असून कायदेविषयक जनजागृतीला प्रोत्साहन देण्याला सरकारचं प्राधान्य असल्याचं त्यांनी सांगितलं.

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणानं तयार केलेल्या समाज मध्यस्थी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचं उद्‌घाटन करण्यात आलं.

या कार्यक्रमाला कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल उपस्थित होते. गरजू लोकांना कायदेविषयक मदत देण्यात राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणानं महत्वाची भूमिका बजावली आहे असं मेघवाल यांनी सांगितलं. प्रत्येकाला कायदेशीर मदत मिळावी या उद्देशानं टेलि लॉ सेवा सुरू करण्यात आली. २०१७ पासून आतापर्यंत एक कोटींपेक्षा जास्त नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला अशी माहिती त्यांनी दिली.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आफ्रिकेतील अंगोला आणि बोत्सवाना या दोन राष्ट्रांच्या दौऱ्यावर असून काल रात्री त्या अंगोलाची राजधानी लुआंडा इथ पोहचल्या . भारत आणि अंगोला यांच्यातील द्विपक्षीय संबंधांच हे 40 व वर्ष असून आतापर्यंतची भारतीय राष्ट्रपतींची ही पहिलीच अंगोला भेट आहे .अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ मैनुअल गोंजाल्विस लौरैंको यांच्याबरोबर आज राष्ट्रपती मुर्मू द्विपक्षीय चर्चा करणार असून , त्यानंतर दोन्ही देशांदरम्यान विविध करारांवर हस्ताक्षर करण्यात येणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू येत्या मंगळवारपर्यंत अंगोला इथ राहणार असून यादरम्यान त्या अंगोला राष्ट्र स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तसच तिथल्या संसदेला संबोधित करणार आहेत . अंगोलातील भारतीय समुदायाशीही राष्ट्रपती मुर्मू संवाद साधणार असून तिथल्या महत्वाच्या व्यक्तींची भेट घेणार आहेत .
या वर्षाच्या सुरुवातीला अंगोलाचे राष्ट्रपती पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटले होते त्यावेळी भारताने अंगोलाच्या संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणसाठी २०० दशलक्ष डॉलर्सची मदत जाहीर केली होती.

सध्या दोन्ही देश या करारावर चर्चा करत आहेत. या करारानंतर अंगोला भारताकडून काही संरक्षण साधने आणि उपकरणे खरेदी करू शकतो.

अँगोला हा आफ्रिकेतला भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा तेल आणि ऊर्जा पुरवठादार आहे. तिथे नवीन तेलक्षेत्रे सापडल्यामुळे भारत अँगोलाला तेल शुद्धीकरण आणि शोध कामांमध्ये मदत करू शकतो.

भारत अँगोलाला अन्नसुरक्षा मिळवण्यासाठीही मदत करू शकतो — म्हणजेच कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री देऊन शेती सुधारण्यासाठी सहकार्य करू शकतो.

या भेटीत दोन्ही देश आरोग्य सेवा, अवकाश तंत्रज्ञान, डिजिटल सार्वजनिक व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांमध्येही सहकार्याबद्दल बोलू शकतात.
त्याचबरोबर काही आंतरराष्ट्रीय उपक्रमांमध्ये भागीदारी वाढवण्यावरही चर्चा होऊ शकते

दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात 11 ते 13 नोव्हेंबर या कालावधीत बोत्सवाना या आफ्रिकेतल्या दुसऱ्या देशाच्या भेटीसाठी जाणार आहेत.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी  येत्या मंगळवार पासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, मोदी आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक, एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांगचु-२ या जलविद्युत प्रकल्पाचं उद्घाटन करतील. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे हा प्रकल्प विकसित केला आहे. भूतानचे चौथे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात पंतप्रधान सहभागी होतील आणि भूतानचे पंतप्रधान शरिंग तोबगे यांचीही भेट घेतील.

जागतिक शांती प्रार्थना महोत्सवात पंतप्रधान मोदी सहभागी होणार असून  थिंपूमधील ताशिचोडझोंग इथं भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांच्या स्थळी प्रार्थना करणार आहेत.

दरम्यान पंतप्रधानांच्या भूतान भेटीच्या पार्श्वभूमीवर, भारतातून आणलेल्या भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांचा एक भाग थिंपूतील प्रमुख मठ, ताशिचोडझोंग इथं ठेवण्यात आला आहे. हा मठ भूतानच्या सर्वोच्च आध्यात्मिक आणि राजकीय संस्थांचं केंद्र मानला जातो. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री वीरेंद्र कुमार यांच्यासह भूतानचे पंतप्रधान शरिंग तोबगे, इतर मंत्री आणि वरिष्ठ पदाधिकारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**संसदअधिवेशन**

संसदेचं हिवाळी अधिवेशन १ ते १९ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजूरी दिली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समा माध्यमावरील संदेशाद्वारे ही माहिती दिली.

**बिहार प्रचार**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराचा आज  अखेरचा दिवस आहे. या टप्प्यात येत्या मंगळवारी २० जिल्ह्यातल्या १२२ जागांसाठी मतदान होणार आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात काल राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागठबंधनसह इतर पक्षांच्या नेत्यांनी दिवसभर प्रचाराचा धडाका लावला. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी बेतिया आणि सीतामढी इथं सभा घेतल्या. याशिवाय भाजपा नेते राजनाथ सिंह, अमित शहा, मुख्यमंत्री नितीश कुमार, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही अनेक  ठिकाणी जाहीर सभा घेतल्या दुसरीकडे काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी पूर्णिया इथं, तर महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव यांनी बाराछत्ती इथं प्रचार केला. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनीही प्रचार केला.

दरम्यान,बिहारमधल्या समस्तीपूर जिल्ह्यामधल्या सराईरंजन मतदारसंघात ईव्हीएममधल्या व्हीव्हीपॅट पावत्या बाहेर पडल्याचं आढळून आल्यामुळे सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं

आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशीचे आदेश मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिले आहेत.

**गोयल**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान संतुलित आणि परस्पर फायदेशीर व्यापक आर्थिक सहकार्य करार अर्थात CECA लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हंटलं आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न इथं ऑस्ट्रेलियाचे व्यापार आणि पर्यटन मंत्री डॉन फॅरेल आणि कौशल्य आणि प्रशिक्षण मंत्री अँड्र्यू जाइल्स यांच्याशी द्विपक्षीय चर्चेनंतर गोयल बोलत होते. दोन्ही देशांमधील करारासह भारत-ऑस्ट्रेलिया आर्थिक भागीदारीची पूर्ण क्षमता तपासून पाहण्यावर चर्चा झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हंटलं आहे. बैठकीदरम्यान, मंत्र्यांनी CECA वाटाघाटींअंतर्गत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला आणि द्विपक्षीय व्यापार आणि आर्थिक भागीदारी वाढवण्याच्या मार्गांवर चर्चा केली.

**मुक्त व्यापार**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान मुक्त व्यापार करार करण्यासाठीच्या चौथ्या टप्प्यातील चर्चा पूर्ण झाली आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने सांगितल कि ही चर्चा दोन्ही देशांदरम्यान वस्तु आणि सेवांचा व्यापार , आर्थिक सहकार्य आणि निर्मितीचे नियम या विषयांवर केंद्रित होती आणि ती सकारात्मक झाली. भारताचे उद्योगमंत्री पीयूष गोयल आणि न्यूझीलंडचे उद्योगमंत्री टॉड मॅक्ले यांनी या सकारात्मक चर्चेच स्वागत केल असून लवकरच भारत न्यूझीलंड दरम्यान च्या मुक्त व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यात येईल अस दोन्ही नेत्यांनी म्हंटल आहे.

**क्रिकेट**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका भारतानं 2-1 अशी जिंकली आहे. मालिकेतला निर्णायक पाचवा सामना काल पावसामुळं रद्द करावा लागला. त्यामुळं चौथा सामना जिंकून मालिकेत आघाडी घेतलेल्या भारतीय संघानं मालिका जिंकल्याचं घोषित करण्यात आलं. भारतीय फलंदाज अभिषेक शर्मा मालिकावीर ठरला. या विजयामुळं ऑस्ट्रेलियाविरुद्ध वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यांची मालिका जिंकण्याची गेल्या १७ वर्षांपासूनची परंपरा भारतानं कायम राखली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.**